MHSO140016422020

दाखल तारीखः- ०६/०१/२०२०

नोंद तारीखः- ०६/०१/२०२०

निकाल तारीखः- ०८/०३/२०२६

**कालावधीः-०६ वर्षे ०३ महिने ०२ दिवस**

**भाग – अ**

| | | |
|---|---|---|
| | **जी. एस. पाटील यांचे न्यायालयात**<br>**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, ता.बार्शी, जि. सोलापूर**<br>**(न्यायनिर्णय दि. ०८ मार्च २०२६)**<br>**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.७२२/२०२२**<br>**नि.क्र.२६** | |
| | (एफ.आय.आर/गुन्हा नं.६३४/२०२० बार्शी शहर पोलीस स्टेशन, ता. बार्शी, जि. सोलापूर) | |
| तक्रारदार / अभियोगपक्ष | | महाराष्ट्र शासन तर्फे<br>बार्शी शहर पोलीस स्टेशन, बार्शी, ता.बार्शी, जि. सोलापूर |
| व्दारे प्रतिनिधित्व | | सहा.सरकारी अभियोक्ता श्री आर.बी.काजळे |
| आरोपी | | **लक्ष्मीबाई गजेंद्र काळे,**<br>वय- ६० वर्षे, व्यवसाय-मजुरी,<br>रा. अलीपूर रोड, देशमुख प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर |
| व्दारे प्रतिनिधित्व | | विधिज्ञ श्रीमती. आर. व्ही. डमरे |

**भाग- ब**

| | |
|---|---|
| गुन्हयाचा दिनांक | २७/०८/२०२० |
| एफ.आय.आर तारीख | २७/०८/२०२० |
| आरोपपत्राची तारीख | ०६/११/२०२० |
| दोषारोपाची तारीख | १३/०३/२०२४ |
| पुरावा सुरवात तारीख | १२/०९/२०२४ |
| निकाल राखुन ठेवला ती तारिख | --- |
| निकालाची तारिख | ०८/०४/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | --- |

**आरोपी तपशिल**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारिख | जामिनावर सुटकेची तारिख | दोषारोप | जर निर्दोष अथवा दोषी असेल तर | शिक्षा ठोठावलेली शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहिता चे कलम ४२८ चे उद्देशाने खटल्या दरम्यान कोठडी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | लक्ष्मीबाई गजेंद्र काळे | सीआरपीसी ४१अ(१) प्रमाणे नोटीस दिली आहे. | -- | मुंबई मदयनिषेध कायदा १९४९ चे कलम ६५(ई). | निर्दोष | -- | -- |

## भाग - क

**अभियोगपक्ष /बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी**

**अ. अभियोगपक्षः**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | शशिकांत गोरख लोकरे, (नि.क्र.११ लगत) | फिर्यादी |
| २. | गणेश नागनाथ दळवी,(नि.क्र.११ लगत) | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| ३. | सोनीयादेवी लक्ष्मण मुंढे, (नि.क्र.११ लगत) | साक्षीदार |
| ४. | इसाक महंमद यासीन शेख, (नि.क्र.११ लगत) | साक्षीदार |
| ५. | रामा भगवान कबाडे, (नि.क्र.११ लगत) | पंच साक्षीदार |

**ब. बचावपक्षाचा साक्षीदारः नाही.**

**क. न्यायालयीन साक्षीदारः नाही.**

**अभियोगपक्ष /बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदार निशाणी यादी**

**अ. अभियोगपक्षः**

| अ. क्रं | निशाणी क्रंमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ब. बचावपक्ष :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन निशाणीः नाही.**

**ड. मुद्देमालः६८/२०२०**

| अ.क्र. | मुद्देमाल |
|---|---|
| १. | १५ लिटर हातभट्टी दारु किंमत रु.४५०/–. |

## न्यायनिर्णय

(दि.०८ मार्च, २०२६ रोजी घोषित)

१. आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) अन्वये खटला दाखल करण्यात आला आहे.

**सरकार पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे** :-

२. फिर्यादी पो.कॉ शशीकांत गोरख लोकरे,ब.नं.२१४०, नेमणुक बार्शी शहर पोलीस स्टेशन, ता. बार्शी हे दिनांक २७/०८/२०२० रोजी पोसई केदार, मुंढे, सय्यद, दळवी व गोसावी असे सरकारी वाहनामधुन बार्शी शहरात पेट्रोलिंग करत असताना त्यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, एक महिला अलीपुर रोड, देशमुख प्लॅाट, बार्शी येथे घराचे बाजुला आडोशाला चोरुन हातभट्टी दारुची विक्री करत आहे. त्यांनी दोन पंचाना पो.ठाणेस बोलावून बातमी प्रमाणे हकीकत सांगुन ते पंच म्हणून येण्यास तयार झाल्याने ते सर्वजन सरकारी वाहनाने पंचनामा करणेसाठी लागणारे साहित्य घेवून सदर ठिकाणी गेले असता, तेथे अलीपुर रोड, देशमुख प्लॅाट, बार्शी घराचे बाजुला झाडाजवळ एक महिला हातभट्टी दारुचे कॅन घेवून बसलेली दिसली. फिर्यादी व इतर कर्मचारी यांची येण्याची चाहुन लागताच आरोपी पळुन जाण्याच्या प्रयत्नात असताना आरोपीस त्यांनी गराडा घालुन जागेवरच पकडले ती वेळ १९:३० वाजताची होती. सदर आरोपीचे नाव विचारले असता, तिने तिचे नाव लक्ष्मीबाई गजेंद्र काळे असे असल्याचे सांगितले. सदर आरोपीजवळ तपासणी केली असता रु. ४५०/- किंमतीची प्लॅस्टीक कँन त्यामध्ये १५ लिटर आंबट उग्र वासाची हातभट्टी मिळून आली. सदर हातभट्टी दारु पोसई केदार यांनी जप्त करुन ताब्यात घेतली व जप्त मालातून सॅम्पलकरीता एका बाटलीत काढून त्यावर पंचाचे व पोसई केदार यांच्या सहीचे कागदी लेबल लावले. सदर आरोपीस त्यास दारु विक्रीचा परवाना आहे काय असे विचारले असता तिने तो नसल्याचे सांगितले. त्यानंतर आरोपीविरुध्द तक्रार दाखल केली.

३. सदर फिर्याद गु.र.क्र.६३४/२०२० ने नोंद होऊन सदर गुन्ह्याचा तपास श्री. इसाक म. यासीन सय्यद, पो.हे.कॉ/१०८८, बार्शी शहर पोलीस स्टेशन, बार्शी यांनी केला. तपासादरम्यान, त्यांनी मुद्देमालाचा जप्ती पंचनामा केला. साक्षीदारांचे तपासटिपण नोंदविले. जप्त मुद्देमाल पत्राव्दारे रासायनिक तपासणीसाठी पाठविला. तपासाअंती आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्यांनी न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

४. आरोपीविरुध्द गुन्ह्याचा तपशिल (नि.क्र.११) वर निश्चित केला. गुन्ह्याचा तपशिल आरोपीला वाचून व समजावून सांगितला असता तिने गुन्हा कबुल नसल्याचे सांगून प्रकरण पुढे चालवायचे असल्याचे कथन केले.

५. अभियोग पक्षाचे तोंडी विनंतीवरुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आले. आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने आरोपीचे फौ.प्र.संहितेचे कलम ३१३ प्रमाणेचा जबाब नोंदविण्यात आले. आरोपीने बचाव प्रित्यर्थ खोटी केस केल्याचे सांगितले.

६. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री.आर.बी.काजळे व आरोपीतर्फे श्रीमती. आर. व्ही. डमरे, विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. उपरोक्त पुराव्यावरुन, खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघत असून त्यावरील निष्कर्ष मी कारणमीमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| | **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करु शकले काय की, दिनांक २७/०८/२०२० रोजी १७:४७ वाजताचे सुमारास मौजे अलिपूर रोड, देशमुख प्लॉट, ता. बार्शी, जि. सोलापूर, आरोपी एकूण ४५०/– किमतीची हातभट्टी दारु विक्रीकरीता स्वतःच्या कब्जात विना परवाना, बेकायदेशीरपणे बाळगला व त्याव्दारे, महाराष्ट्र दारुबंदी | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | अधिनियम, कलम ६५ (ई) अन्वयेचा गुन्हा केला? | |
| २. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

७. आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) अन्वये सदर खटला दाखल झाला आहे. सदर कलमाअंतर्गत आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द होण्यासाठी आरोपीने दिनांक २७/०८/२०२० रोजी १७:४७ वाजताचे सुमारास मौजे अलिपूर रोड, देशमुख प्लॉट, ता. बार्शी, जि. सोलापूर, आरोपी एकूण ४५०/- किमतीची हातभट्टी दारु विक्रीकरीता स्वतःच्या कब्जात विना परवाना, बेकायदेशीरपणे बाळगला ही बाब सिध्द होणे गरजेचे असते. सबब, आरोपीविरुध्द सदर खटल्याअंतर्गत गुन्हा शाबित होण्यासाठी वरील बाब त्यांच्याविरुध्द शाबित होते किंवा कसे याच्या निष्कर्षापर्यंत येणे आवश्यक आहे.

**मुद्दा क्र.१ बाबत.**

८. आरोपीविरुध्दचा दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने अभिलेखावर अभियोगपक्षाचे फिर्यादी साक्षीदार क्र.१ शशिकांत गोरख लोकरे यांना तपासलेले आहे. त्यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान कथन केले आहे की, दिनांक २७/०८/२०२० रोजी बार्शी शहर पोलीस ठाणे येथे कार्यरत होते. सदर दिवशी ते पो.उप.निरीक्षक केदार, म.पो.शि, मुंडे, पोहे सय्यद, पो.ना दळवी, पो.शि गोसावी असे सर्व बार्शी शहर हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, अलीपूर रोड, देशमुख प्लॉट, बार्शी येथे एक महिला चोरुन हातभट्टी दारु विक्री करीत आहे. त्यानंतर दोन पंचांना पोलीस ठाणेला बोलवून बातमीची माहिती समजावून सांगितली. त्यानंतर सदर ठिकाणी कार्यवाहीसाठी पंच म्हणून त्यांना सोबत येण्याचे विनंती केली. त्यानंतर ते सरकारी वाहनाने घटनास्थळाच्या ठिकाणी गेले असता सदर ठिकाणी एक महिला

घराच्या आडोशाला प्लॅस्टीकचे कॅन ताब्यात घेवून बसलेली दिसली. त्यांनी जवळ गेले असता महिलेने पळुन जाण्याचा प्रयत्न केला. तद्नंतर आरोपीस जागेवरच पकडले. ती वेळ १९:३० वाजताची होती. आरोपीस तिचे नाव पत्ता विचारले असता लक्ष्मीबाई गजेंद्र काळे असे सांगितले. तिच्या ताब्यातील प्लॅस्टीकचे कॅन तपासले असता त्यामध्ये आंबट द्रव असलेले हातभट्टीचे १५ लिटर दारु अंदाजे किंमत ४५०/– इतके असलेले मिळाले. सदर दारु पो.उप निरीक्षक केदार यांनी पंचनामा करुन ताब्यात घेतली. सदर मुद्देमालाचे नमुना काढून घेतला. त्यानंतर परवाना विचारले असता आरोपीने नाही म्हणून सांगितले. सदर महिलेला मुद्देमाल ताब्यात घेवून पोलीस स्टेशनला आले व घटनेबाबत फिर्याद दिली. साक्षीदारास फिर्याद (नि.क्र.१३) दाखविण्यात आली, ती तीच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर त्यांची सही आहे. ज्या महिलेविरुध्द फिर्याद दिला. महिलेस साक्षीदार ओळखू शकतात. साक्षीदारास घटनास्थळ/जप्ती पंचनामा (नि.क्र.१४) दाखविण्यात आला, त्यावर पो.उप.निरीक्षक केदार यांनी सही आहे. ते त्यांचे वरिष्ठ असल्याने त्यांची सही ते ओळखतात. तसेच त्यावर दोन पंचाचे सह्या आहेत. पंचनाम्यामधील मजकूर बरोबर आहे.

९. सदर साक्षीदाराचे आरोपीतर्फे विधीज्ञ यांनी उलटतपास घेतला. सदर उलटतपासादरम्यान साक्षीदार मान्य केले की, बातमीदाराचे नाव साक्षीदारास सांगता येणार नाही. जप्त केलेली द्रव्य हे दारुच आहे हे सांगाण्यासाठी साक्षीदाराकडे कोणतीही विशेष ज्ञान नाही. साक्षीदार पुढे त्यांच्या फिर्यादीमधील मजुकर खोटे असल्याचे अमान्य केलेले आहे. महिन्याला दारुच्या केसेस करावे लागतात म्हणून आरोपीविरुध्द खोटी फिर्यादी दिली, वरिष्ठाच्या सांगण्यावरुन खोटी फिर्यादी दिली, खोटी साक्ष देत आहे हे देखील खोटे सांगत असल्याचे अमान्य केलेले आहे.

१०. अभियोग पक्षाने अभिलेखावर प्रत्यक्षदर्शी साक्षीदार क्र.२ गणेश नागनाथ दळवी, पोलीस हवालदार, यांना तपासले. त्यांनी त्यांच्या

पुराव्यादरम्यान कथन केले की, दिनांक २७/०८/२०२० रोजी ते बार्शी शहर पोलीस ठाण्याला नेमणूक होती. सदर दिवशी पेट्रोलिंग करीत असताना अलीपुर रोड येथे दारुची विक्री होत आहे याची बातमी मिळाली. बातमी मिळाल्यानंतर दोन पंचाना घेवून तेथे गेले असता त्या ठिकाणी एक महिला झाडाखाली दारु विक्री करताना मिळाली. महिला पळुन जाण्याचा प्रयत्न करत होती, तिला गराडा घालुन पकडली. त्यांनी छापा हा १९:३० वाजता टाकला. महिलेला पकडल्यानंतर तिच्याकडे दारुचा माल मिळून आला. महिलेस तिचे नाव विचारले असता लक्ष्मीबाई गजेंद्र काळे सांगितले. पी.एस.आय केदार यांनी दोन पंचासमक्ष मुद्देमाल जप्त केला. फिर्याद पो.कॉ. लोकरे यांनी दिली. त्यांच्याकडे घटनेबद्दल चौकशी केली होती. आरोपीस पाहिल्यास ते ओळखू शकतात.

११. सदर साक्षीदाराचे आरोपीतर्फे विधीज्ञ यांनी उलटतपास घेतला. सदर उलटतपासादरम्यान साक्षीदार मान्य केले की, घटनेच्या वेळी कोरोना संसर्गामुळे लॉकडाउन होते, तेव्हा लोक बाहेर पडत नव्हते. साक्षीदार पुढे त्यांच्या जबाबातील मजकूर खोटे सांगत असल्याचे अमान्य केलेले आहे.

१२. अभियोग पक्षाने अभिलेखावर अभियोगपक्षाचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार क्र.३ सोनीयादेवी लक्ष्मण मुंढे, महिला पोलीस कॉन्स्टेबल यांना तपासले. त्यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान कथन केले की, दिनांक २७/०८/२०२० रोजी ते बार्शी शहर पोलीस ठाण्याला पो.कॉ म्हणून नेमणुकीस होते. सदर दिवशी ते पी.एस.आय केदार, सय्यद, गोसावी यांनी बार्शी शहर येथे पेट्रोलिंग करीत असताना बातमी मिळाली की, एक महिला अलीपूर रोड येथे दारुची विक्री करीत आहे. त्यानंतर त्यांनी बातमी मिळाल्याठिकाणी दोन पंचासमक्ष जावून ७:३० वाजता छापा टाकला असता त्या ठिकाणी एक महिला दिसून आली. ती पळुन जात होती तेव्हा तिला गराडा घालुन पकडले. तिचे नाव विचारले असता लक्ष्मीबाई गजेंद्र काळे सांगितले. पी.एस.आय. केदार यांनी सॅम्पल कॅनमधुन रासायनिक तपासणीसाठी काढून घेतली. फिर्याद पो.कॉ लोकरे यांनी दिली. आरोपीस पाहिल्यास साक्षीदार

ओळखू शकतात. सदर साक्षीदार यांचा आरोपीतर्फे विधीज्ञ यांनी उलटतपास घेतला. सदर उलटतपासादरम्यान साक्षीदार त्यांच्या जबाबातील मजकूर खोटे सांगत असल्याचे अमान्य केलेले आहे.

१३. अभियोग पक्षाने अभिलेखावर अभियोगपक्षाचे साक्षीदार क्र.४ इसाक महंमद यासीन शेख, पोहेकॉ यांना तपासले. त्यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान कथन केले की, दिनांक २७/०८/२०२० रोजी ते बार्शी शहर पोलीस ठाण्याला डी.बी पथकामध्ये नेमणुक होती. सदर दिवशी पेट्रोलिंग करीत असताना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, अलीपुर रोड येथे एक महिला हातभट्टी दारुची विक्री करीत आहे. त्याप्रमाणे त्यांनी दोन पंचाना बोलावून बातमी मिळाल्याचे ठिकाणी जावून अलीपूर रोड देशमुख प्लॉट येथे गेले असता, तेथे एक महिला दारुची विक्री करीत होती. तिला गराडा घालुन जागेत पकडले. तिच्या जवळील कॅन तपासुन पाहिला असता कॅनमध्ये १५ लिटर हातभट्टीची दारु मिळाली. सदरील दारु पी.एस.आय. केदार यांनी महिला लक्ष्मीबाई काळे दारु विक्री करीत असल्याचे आढळून आली. साक्षीदार आरोपीस पाहिल्यास ओळखू शकतात. सदर साक्षीदार यांचा आरोपीतर्फे विधीज्ञ यांनी उलटतपास घेतला. सदर उलटतपासादरम्यान साक्षीदार मान्य केले की, दोषारोप दाखल करीत असताना रासायनिक पृथकरण अहवाल आला नाही, देशमुख प्लॉट गजबजलेला परिसर आहे. आजुबाजुच्या लोकांचे जबाब घेतलेले नाही.

१४. अभियोग पक्षाने अभिलेखावर अभियोगपक्षाचे पंच साक्षीदार क्र.५ रामा भगवान कबाडे यांना तपासले. त्यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान कथन केले की, दिनांक २७/०८/२०२० रोजी पी.एस.आय केदार यांनी बोलविले होते. त्यांनी साक्षीदारास पोलीस स्टेशनला बोलविले होते. त्यांनी पोलीस स्टेशनवरुन पंचनामेसाठी कोठे गेले नाही. त्यांनी देशमुख प्लॉट येथे पंचनामेसाठी गेले असे काही घडले नाही. पुढे साक्षीदारास पंचनामेवरील अ.क्र.१ ची सही (नि.क्र.१९) दाखविली, त्यावर त्यांची सही आहे. परंतु त्यातील मजकूर साक्षीदारास माहित

नाही. त्यानंतर सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे उलटतपासामध्ये प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता तशी ती त्यांना देण्यात आली. परंतु, त्यामधून आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत होईल आणि अभियोग पक्षास सहाय्यभूत ठरेल असे काहीही अभिलेखावर आलेले नाही.

१५. अभिलेखावरील साक्षीदार पुराव्यावरुन असे स्पष्ट होते आहे की, अभिलेखावर रासायनिक विश्लेषणाचा अहवाल दाखल केलेला नाही. त्यामुळे जप्त मुद्देमाल ही दारु होती याबाबत साशंकता निर्माण होते. तसेच जप्ती पंचनाम्यावरील पंच यांनी त्यांच्या समोर गुन्ह्यातील मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातून जप्त झाल्याचे साक्षीपुराव्या दरम्यान नाकारले आहे. त्यामुळे सदर मुद्देमाल हा दारु आहे आणि आरोपीच्या ताब्यातून जप्त झाली आहे किंवा कसे याबाबत साशंकता निर्माण होते. पंचनाम्यातील पंच यांनी अभियोग पक्षास सहाय्य केलेले नाही. साक्षीदार क्र. १ व ४ हे पोलीस कर्मचारी आहेत त्यांची साक्ष आरोपीविरुध्द गुन्हा संशयाचा पलीकडे जावून सिध्द होण्यासाठी सक्षम नाही. अभियोग पक्षाने इतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासलेले नाही. सबब, घटनास्थळावरुन आरोपीच्या ताब्यातून मुद्देमाल जप्त करण्यात आला ही बाब सिध्द होत नाही. त्यामुळे दिनांक २७/०८/२०२० रोजी १७:४७ वाजताचे सुमारास मौजे अलिपूर रोड, देशमुख प्लॉट, ता. बार्शी, जि. सोलापूर, आरोपी एकूण ४५०/- किमतीची हातभट्टी दारु विक्रीकरीता स्वतःच्या कब्जात बेकायदा विना परवाना, दारु परवाना नसतानाही बेकायदेशीरपणे बाळगला ही बाब पुराव्याअभावी संशयाच्या पलिकडे जावून सिध्द होत नाही. त्यामुळे आरोपीविरुध्द सदर गुन्हा शाबीत होत नाही. सबब, वरील सर्व कारणांचा विचार करता मी मुद्दा क्र. १ नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दे क्र.२ बाबत.</u>**

१६. आरोपीविरुध्द सदर गुन्हा हा संशयाच्या पलीकडे सिध्द होवू शकलेला नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत

करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी लक्ष्मीबाई गजेंद्र काळे यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५ (१) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) प्रमाणेच्या गुन्ह्यातून सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र व वैयक्तिक बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ च्या पुर्ततेकरीता रक्कम रुपये १,५०००/– चे वैयक्तिक बंधपत्राची पूर्तता करावी.

४. जप्त मुद्देमाल १५ लिटर हातभट्टी दारु अपील कालावधी संपल्यानंतर नाश करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क यांचेकडे पाठविण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

Sd/-

बार्शी

**( जी. एस. पाटील )**

दिनांकः– ०८/०४/२०२५

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, बार्शी

संक्षिप्त फौ.ख.क्र.७२२/२०२०

सरकार वि.विकास, (न्यायनिर्णय)

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | K.S Naik |
| (b) | Court | : | Smt G. S. Patil,<br>J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 08/04/2026 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 08/04/2026 |